<u>**नियमित दिवाणी दावा क्र. १८९/२०१६ मध्ये निशाणी क्र. ५५ कडील अर्जावर आदेश.**</u>

१) प्रस्तुतचा अर्ज वादींतर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६, नियम १७ मधील तरतुदीनुसार वादपत्रामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्यासाठी व दावा मिळकतीचा कच्चा नकाशा दाखल करण्यास परवानगी मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२) वादींच्या प्रस्तुत अर्जातील कथनानुसार वादींना वादपत्राच्या परिच्छेद क्र. २ मध्ये उपपरिच्छेदामध्ये ओळ क्र. ३ मध्ये दिनांक ०२/०२/२००६ रोजी घेतले या मजकूराच्या पुढे चतु:सिमा नमुद करण्याच्या आहेत. तसेच वादपत्राच्या परिच्छेद क्र. २ मध्ये उपपरिच्छेदामध्ये ओळ क्र. ४ मध्ये दिनांक ३०/०५/१९९४ रोजीच्या खरेदीपत्रातील ४१ आर या क्षेत्राच्या चतु:सिमा नमुद करण्याच्या आहेत. तसेच वादी हे या अर्जाद्वारे दावा मिळकतीचा कच्चा नकाशा या प्रकरणात दाखल करु इच्छीत आहेत व सदर कच्च्या नकाशामध्ये निळ्या रंगाने दर्शविलेल्या वादीच्या मालकीच्या जागेत प्रतिवादींनी घुसखोरी चालू केली अशा आशयाचा मजकुर वादपत्राच्या परिच्छेद क्र. २ मध्ये ओळ क्र. ८ मधील वाक्याच्या शेवटी समाविष्ट करु इच्छीत आहेत.

३) प्रस्तुत अर्जावर प्रतिवादींतर्फे दिलेल्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, दावा अंतिम युक्तीवादावर आहे. वादींना अशा स्वरुपाची दुरुस्ती यापुर्वीही मागता आली असती. वादी यांच्या मागणीप्रमाणे दुरुस्ती झाली तर दाव्यात क्लीष्टता वाढणार आहे. हा अर्ज दाखल करण्यास वादींना कोणतेही नवीन कारण घडलेले नाही. केवळ प्रतिवादींना त्रास देण्यासाठी हा अर्ज दाखल केला आहे व त्यामुळे अर्ज रद्द करण्यात यावा.

४) प्रस्तुत अर्जाच्या कामी वादींतर्फे विद्वान वकील श्री आर. सी. शहा व प्रतिवादींतर्फे विद्वान वकील श्री मोहिते यांचा युक्तीवाद ऐकला. रोजनाम्याचे व

अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

५) दोन्ही पक्षातील विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला असता व रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसुन येते की, प्रस्तुत प्रकरणात दिनांक २३/०८/२०१८ रोजी निशाणी क्र. २२ कडे वादाचे मुद्दे निश्चित केले आहेत. त्यानंतर वादींनी त्यांचा पुरावा सादर केला आहे. वादींचा पुरावा बंद झाल्यावर प्रतिवादींनी त्यांचा पुरावा सादर केला आहे. दिनांक ०५/०८/२०२४ रोजी प्रतिवादींनी त्यांना जादा तोंडी पुरावा देण्याचा नसल्याबाबत पुरसिस दाखल केली आहे. वादी व प्रतिवादींचा पुरावा संपल्यानंतर वादींतर्फे प्रस्तुतचा दावा दुरुस्तीचा अर्ज दाखल करण्यात आला आहे.

६) वादींनी प्रस्तुतचा दावा हा दावा मिळकतीवरील वादींच्या ताब्यास प्रतिवादींनी हरकत अडथळा करु नये व वादींना दावा मिळकतीतून हुसकावून लावू नये असा निरंतर मनाई हुकूम मिळण्याकरीता दाखल केला आहे. वादपत्राच्या परिच्छेद क्र. १अ मध्ये नमुद केलेल्या मौजे ओंढ (थोरात मळा), ता. कराड येथील जुना गट नं. ९३१/१, नवीन गट नं. १४०/१, क्षेत्र ९ हेक्टर ४७ आर, पोटखराब ० हेक्टर ४२ आर पैकी परिच्छेद क्र. १ब मध्ये नमुद केलेली ० हेक्टर ३०.९० आर व परिच्छेद क्र. १क मध्ये नमुद केलेली ० हेक्टर ४१.२० आर ही मिळकत प्रस्तुत दाव्यातील वादाचा विषय आहे. वादींनी वादपत्राच्या परिच्छेद क्र. १अ व १ब व १क मध्ये नमुद केलेल्या मिळकतींच्या चतु:सिमा देखील नमुद केल्या आहेत.

७) वादींनी वादपत्राच्या परिच्छेद क्र. २ मध्ये उपपरिच्छेदामध्ये असे कथन केले आहे की, वादीच्या पुर्व बाजूस प्रतिवादीची मुळची जमीन होती व त्याच्या पुर्वेस जिवन आनंदराव थोरात यांनी बाबा मारुती फसाले यांच्याकडून याच गट नंबर मधील सुमारे ४० आर क्षेत्र दिनांक ०२/०२/२००६ रोजी घेतले आहे.

वादी हे प्रस्तुत दावा दुरुस्तीच्या अर्जाद्वारे सदर ४० आर क्षेत्राच्या चतु:सिमा सदर परिच्छेद क्र. २ मध्ये नमुद करु इच्छीत आहेत. तसेच वादींनी वादपत्राच्या परिच्छेद क्र. २ मध्ये उपपरिच्छेदामध्ये असे कथन केले आहे की, जिवन आनंदराव थोरात यांनी दिनांक ३०/०५/१९९४ रोजी तानाजी दादु थोरात यांच्याकडून अंदाजे ४१ आर क्षेत्र खरेदी घेतले आहे. वादी हे प्रस्तुत दावा दुरुस्तीच्या अर्जाद्वारे सदर ४१ आर क्षेत्राच्या चतु:सिमा सदर परिच्छेद क्र. २ मध्ये नमुद करु इच्छीत आहेत. वादी हे प्रस्तुतच्या दावा दुरूस्तीच्या अर्जाद्वारे जिवन आनंदराव थोरात यांनी बाबा मारुती फसाले यांच्याकडून दिनांक ०२/०२/२००६ रोजी खरेदी घेतलेल्या ज्या ४० आर क्षेत्राच्या व जिवन आनंदराव थोरात यांनी दिनांक ३०/०५/१९९४ रोजी तानाजी दादु थोरात यांच्याकडून खरेदी घेतलेल्या ज्या ४१ आर क्षेत्राच्या चतु:सिमा परिच्छेद क्र. २ मध्ये नमुद करु इच्छीत आहेत त्या चतु:सिमा वादींना दावा दाखल करतेवेळी ज्ञात होत्या व ती बाब वादींच्या माहितीत असणारी बाब आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणाची न्यायचौकशी सुरू होण्यापुर्वी वादींना प्रस्तुत अर्जातील चतु:सिमांबाबतची नमुद बाब दावा दुरुस्तीकामी पुढे आणता आली असती. परंतु प्रस्तुत प्रकरणाची न्यायचौकशी सुरू होण्यापुर्वी वादींनी सदर बाब वादपत्रातील दुरुस्तीकामी पुढे आणलेली नाही. योग्य ती खबरदारी घेऊन सुद्धा प्रस्तुत प्रकरणाची न्यायचौकशी सुरू होण्यापुर्वी प्रस्तुत अर्जातील नमुद बाब ही पुढे आणता आली नाही व दावा दुरूस्तीकामी उपस्थीत करता आली नाही अशी वादींची केस नाही.

८) वादी हा या अर्जाद्वारे दावा मिळकतीचा कच्चा नकाशा या प्रकरणात दाखल करु इच्छीत आहे व सदर कच्च्या नकाशामध्ये निळ्या रंगाने दर्शविलेल्या वादीच्या मालकीच्या जागेत प्रतिवादींनी घुसखोरी चालू केली अशा आशयाचा मजकुर वादपत्राच्या परिच्छेद क्र. २ मध्ये ओळ क्र. ८ मधील वाक्याच्या शेवटी समाविष्ट करु इच्छीत आहेत. वादींच्या वादपत्रातील कथनांचे

अवलोकन करता असे दिसून येते की, वादींनी त्यांच्या वादपत्रामध्ये प्रतिवादी हे वादींच्या दावा मिळकतीवरील ताब्यास हरकत अडथळा करत असल्याचे कथन केले आहे. प्रतिवादींनी दावा मिळकतीवरील ताब्यास हरकत अडथळा केल्याबाबतची व हरकत अडथळा करत असल्याबाबतची कथने वादींनी यापुर्वीच वादपत्रामध्ये नमुद केली आहेत ही बाब विचारात घेता व तसेच वादी हे प्रस्तुत दावा दुरुस्तीच्या अर्जाद्वारे जी बाब वादींना दावा दाखल करतेवेळी ज्ञात होती व ती बाब वादींच्या माहितीत असणारी बाब आहे ही बाब विचारात घेता व योग्य ती खबरदारी घेऊन सुद्धा प्रस्तुत प्रकरणाची न्यायचौकशी सुरू होण्यापुर्वी प्रस्तुत अर्जातील नमुद बाब ही पुढे आणता आली नाही व दावा दुरूस्तीकामी उपस्थीत करता आली नाही अशी वादींची केस नाही ही बाब विचारात घेता व वादींनी वादपत्रामध्ये दावा मिळकतीच्या सविस्तर चतु:सिमा नमुद केल्या आहेत ही बाब विचारात घेता व वरील नमुद सर्व कारणे विचारात घेता माझ्या मते दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६, नियम १७ मधील परंतुकातील (proviso) तरतुदीनुसार वादींची प्रस्तुत अर्जातील दावा दुरुस्तीस परवानगी मिळण्याची विनंती कायद्याने समर्थनीय नाही व ती नामंजुर होण्यास पात्र आहे. परंतु माझ्या मते वादींना या अर्जात विनंती केल्याप्रमाणेचा दावा मिळकतीचा कच्चा नकाशा अभिलेखावर दाखल करण्यास परवानगी दिल्यास प्रतिपक्षावर कोणताही अन्याय होणार नाही. त्यामुळे माझ्या मते दावा मिळकतीचा कच्चा नकाशा दाखल करण्यास परवानगी मिळण्याची वादींची प्रस्तुत अर्जातील विनंती मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आ दे श

१) वादपत्रामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्याची वादींची प्रस्तुत अर्जातील विनंती नामंजुर करण्यात येते.

२) वादींना दावा मिळकतीचा कच्चा नकाशा दाखल करण्यास परवानगी देण्यात येते.

३) या अर्जाचा खर्च ज्याचा त्याने सोसण्याचा आहे.

४) वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2024.10.16 17:37:15 +0530

दिनांकः– १६/१०/२०२४ (पां. लिं. घुले)
ठिकाणः– कराड २रे सह दि. न्या. व. स्तर, कराड.